**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

<u>अधिकचा सरतपास शपथेवर वादीचे विधीज्ञ श्री. जी.जे.गिरकर यांचे मार्फत.</u>

०५. आता मला अभिलेखावर दाखल असलेले नि.क्र. ४/१५ वरील दि. १५/०६/२०१७ रोजीचे खरेदीखताची सहीसुद नक्कल दाखविण्यात आली. सदर खरेदीखत वसंत अच्युत्त प्रभुगावकर यांनी शशिकांत जनार्दन बागवे यांना करुन दिलेले आहे. त्यावर वसंत अच्युत्त प्रभुगावकर यांची सही व अंगठा तसेच शशिकांत जनार्दन बागवे यांची सही व अंगठा आहे. तसेच साक्षीदार नामे पंकज पांडूरंग परब व शेखर गजानन गाड यांचे सहया आहे. सदर दस्ताची मुळ प्रत प्रतिवदी क्र. १ च्या ताब्यात आहे. सबब, मी दुय्यम पुरावा म्हणून सदर खरेदीखताची सहीसुद नक्कल मुळ वादीने यांनी दाखल केलेली आहे. त्यास **<u>नि.क्र. ७३</u>** देण्यात येते.

०६. आता मला अभिलेखावर दाखल असलेले नि.क्र. ७६/१ वरील दाखल असलेल्या कुलमुखत्यारपत्राची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर कुलमुखत्यारपत्र हे वादी विश्वास विजय परब यांनी मला करुन दिलेले आहे. त्यावर वादी यांची सही, अंगठा व फोटो आहे तसेच त्यावर माझी, अंगठा व फोटो आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचे कुलमुखत्यारपत्र हे नोटरी आर.के.परुळेकर यांचेकडे अ.क्र. १२६/२०२५ दि. ०३/०३/२०२५ रोजी नोंदविण्यात आलेले आहे. मुळ प्रत ही नियमित दिवाणी दावा क्र. ७५/२०१७ मध्ये दाखल असल्याने मी या प्रकरणात हजर करु शकलेलो नाही. त्यास **<u>नि.क्र. ७७</u>** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. एस.एन.पई यांना वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर. सबब, प्रतिवादीतर्फे उलट तपासाकरीता प्रकरण तहकूब करण्यात येते.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १७/०६/२०२५

मोहम्मद कैसर फकीह
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण.